| | |
|---|---|
| दाखल तारीख | १४/११/२०२२ |
| नोंदणी तारीख | १४/११/२०२२ |
| निर्णय तारीख | १६/१०/२०२४ |
| कालावधी | ०१ व., ११ म., ०२ दि. |
| CNR No.MHGA050008202022 | |

भाग – अ
(न्यायनिर्णयाची शीर्षक पान)
[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (१)]

निशाणी क्र.०८ खाली...

## न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज यांचे न्यायालयात.

(पिठासीन अधिकारी – सतिश गो. गोरे)

| | |
|---|---|
| अपराध क्रमांकाचा तपशील | **अपराध क्र. ३३७/२०२२,** पोलीस स्टेशन, देसाईगंज. |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १६/१०/२०२४ |
| प्रकरण क्रमांक | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ५५४/२०२२** |
| अभियोग पक्ष : | **महाराष्ट्र शासन** तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी, देसाईगंज, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली. (स्वाती भगवान चंदनखेडे/३६१०) |
| अभियोग पक्षातर्फे | **श्री. आर.डब्ल्यु.सकिनलावार,** विशेष सहायक सरकारी अधिवक्ता |
| आरोपी : | **शांताबाई लालचंद देवानी,** वय – ७७ वर्ष, धंदा – मजुरी, रा. आंबेडकर वार्ड, देसाईगंज, ता. देसाईगंज, जि.गडचिरोली |
| आरोपीतर्फे अधिवक्ता : | **श्री. एम.आर.शेंडे** |

**भाग – ब**
**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (२)]**

| | |
|---|---|
| घटनेचा दिनांक : | १२/०८/२०२२ |
| एफ.आय.आर. दिनांक : | १२/०८/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक : | १४/११/२०२२ |
| गुन्ह्याचा तपशील निश्चितीचा दिनांक : | २०/०६/२०२४ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याचा दिनांक : | ०४/०९/२०२४ |
| निकालाकरिता ठेवल्याचा दिनांक : | १५/१०/२०२४ |
| निकाल दिनांक : | १६/१०/२०२४ |
| शिक्षा झाली असल्यास तो दिनांक | ---- |

**आरोपीचा तपशील**

| **आ. क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटकेची तारीख** | **जामिन तारीख** | **दोषारोप /आरोप** | **दोषी / निर्दोष** | **शिक्षा** | **तुरुंगामध्ये न्यायालयीन बंदी कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शांताबाई लालचंद देवाणी | . | १४/११/२०२२ | ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा | निर्दोष | नाही | नाही |

**भाग – क**
**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (३)]**
**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष / न्यायालयाने बोलाविलेल्या साक्षदारांची यादी**

| **क्र.** | **नाव** | **साक्षदाराचे स्वरुप** |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | प्रफुल बलदेव मोटघरे (**नि.क्र.०८ च्या पुढे**) | पंच साक्षदार |
| अ.सा.क्र.२ | जगदिश हरीराम सुर्यवंशी (**नि.क्र.०८ च्या पुढे**) | पंच साक्षदार |

**बचावपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी**

| **अ.क्र.** | **नाव** | **साक्षेचे स्वरुप** |
|---|---|---|
| ब.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

**न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी**

| **अ. क्र.** | **नाव** | **साक्षेचे स्वरुप** |
|---|---|---|
| न्या.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

**सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्राचे स्वरुप** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**बचावपक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्राची यादी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्रांचे स्वरुप** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्राचे स्वरुप** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्राची यादी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्राचे स्वरुप** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**मेटरीअल ऑब्जेक्ट/महत्त्वाच्या वस्तू**

| **अ. क्र.** | **मटेरिअल ऑब्जेक्ट /महत्त्वाच्या वस्तू क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## :: न्यायनिर्णय ::

(जाहिर दिनांक १६/१०/२०२४)

आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराधाकरिता संपरिक्षा चालविण्यात आली. खटल्याच्या न्यायनिर्णयाकरिता पुढील मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष पुढील नमूद कारणांकरिता नोंदविण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, दि. १२/०८/२०२२ ला १७:३० ते १८:०० वाजताच्या सुमारास, आंबेडकर वार्ड, देसाईगंज, ता. देसाईगंज, जिल्हा गडचिरोली येथे आरोपी तिच्या घरी ३० नग देशी दारू प्रत्येकी ९० मिली अवैधरित्या विनापरवाना विक्रीकरिता बाळगुन मिळून आली ? | **...नाही** |
| २. | आदेश काय ? | **...अंतीम आदेशानुसार** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करीता** :–

२. आरोपीवर ठेवलेला दोषारोप सिद्ध करण्याकरिता अभियोग पक्षाने प्रफुल बलदेव मोटघरे **(अ.सा.क्र.१)** व जगदिश हरीराम सुर्यवंशी **(अ.सा.क्र.२)** यांना तपासले. अभियोग पक्षातर्फे पुरसीस **(नि.क्र.०९)** दाखल करून सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आला नसल्यामुळे तिचा फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३(१)(ब) अन्वयेचा जवाब वगळण्यात आला. रासायनिक परिक्षणाचा अहवाल अभिलेखावर दाखल आहे.

३. प्रफुल **(अ.सा.क्र.१)** व जगदिश **(अ.सा.क्र.२)** पंचनाम्यावरील पंच साक्षदार असून त्यांच्या साक्षेत असे आले आहे की, ते आरोपीला ओळखत नाही. पोलिसांनी त्यांना पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलाविले नव्हते व त्यांच्या समक्ष

कोणतीही कारवाई करण्यात आलेली नव्हती. त्यांनी घटनास्थळ कम जप्ती पंचनाम्यावर त्यांच्या सह्या असल्याचे सांगितले आहे, परंतु त्यातील मजकुराबाबत त्यांनी अनभिज्ञता दर्शविली. सदर साक्षदारांनी उलटतपासात विचारल्या जाणारे उत्तर सुचक प्रश्न अभियोग पक्षाद्वारे विचारले असता त्यामध्येही त्यांनी पोलीसांनी त्यांना पंचनामा करण्याकरिता आंबेडकर वार्ड, देसाईगंज येथे आरोपीच्या घरी पंच म्हणून बोलाविले होते व आरोपीच्या ताब्यातून ३० नग देशी दारु जप्त केली होती व त्याबाबतचा घटनास्थळ कम जप्ती पंचनामा तयार केला होता व त्यावर त्यांनी सह्या केल्या होत्या, असे अभियाग पक्षाचे सर्व कथन त्यांनी नाकारले.

४. अभियोग पक्षाद्वारे तपासण्यात आलेले पंच साक्षदार फितूर झालेले आहेत. अभियोग पक्षाने फिर्यादीची साक्ष न नोंदविल्यामुळे अभियोग पक्ष फिर्याद तसेच छापील प्रथम खबर अहवाल व त्यामधील मजकूर, घटनास्थळ कम जप्ती पंचनामा व त्यातील मजकूर सिद्ध करु शकला नाही. अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल सादर केलेला आहे, परंतु जप्त नमुने रासायनिक विश्लेषणाच्या कार्यालयात घेवून जाणारा कोणताही साक्षदार तपासलेला नाही. त्यामुळे नेमके कोणते जप्त नमुने रासायनिक विश्लेषणासाठी पाठविले होते, तसेच अभिलेखावर दाखल रासायनिक विश्लेषणाचा अहवाल हा नेमका कोणत्या प्रकरणातील जप्त नमुन्यांचा आहे, हे स्पष्ट होत नाही. वर चर्चिलेल्या बाबी लक्षात घेता आरोपी देशी दारु अवैधरित्या विनापरवाना विक्रीकरिता बाळगुन मिळून

आली होती, ही बाब स्विकारार्ह नाही तसेच अभियोग पक्ष ती बाब सिद्ध करु शकला नाही.

५. कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये गुन्हा सिद्ध होण्यासाठी जप्त मुद्देमाल मोहा दारु आहे व ती दारु आरोपी विक्री करण्याच्या उद्देशाने विनापरवाना बाळगून होती, या बाबी सिद्ध होणे आवश्यक आहे. तसेच, आरोपीकडून द्रावण जप्त करुन ते प्रथम मुद्देमाल मोहररकडे पोलीस स्टेशनमध्ये जमा केले आणि त्यानंतर मुद्देमाल मोहररपासून त्यामध्ये कोणतीही अदलाबदल किंवा अफरातफर न करता ते रासायनिक विश्लेषणाकरीता पाठविले, याबाबत स्पष्ट असा साखळी पुरावा अभिलेखावर येणे आवश्यक असते.

६. वरील सर्व बाबींचा विचार केला असता असे दिसून येते की, अभियोग पक्ष आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हा सिद्ध करण्यास अपयशी ठरला आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> :–**

७. मुद्दा क्र. १ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरुन आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहे. जप्त मुद्देमालापैकी रासायनिक विश्लेषणाकरिता काढलेल्या मुद्देमालाव्यतिरिक्त इतर मुद्देमाल अधिक्षक, राज्य उत्पादक शुल्क, गडचिराली यांच्याकडे योग्य ती विल्हेवाट लावण्याकरीता अपिल कालावधीनंतर पाठविणे योग्य होईल. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७अ ची पूर्तता आधीच केली आहे, म्हणून मुददा क्र. २ च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) खालील गुन्ह्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जात मुचलके व बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. रासायनिक विश्लेषणाकरिता काढलेल्या मुद्देमालाव्यतिरिक्त इतर मुद्देमाल दारु अपिल कालावधीनंतर अधिक्षक, राज्य उत्पादक शुल्क, गडचिरोली यांच्याकडे योग्य त्या विल्हेवाटीकरीता पाठविण्यात यावी.

**(न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.**)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SATISH GOPALRAO GORE
Date: 2024.10.18 16:23:24 +0530

दिनांक : १६/१०/२०२४

**(सतिश गोपालराव गोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज.
JO CODE- MH02902